# रिझर्व्ह बँकेकडून 'बंधन'ला बँक परवाना

## २३ ऑगस्टला शुभारंभ होणार




मुंबई, बुधवार (वृत्तसंस्था) - सूक्ष्मकर्जपुरवठा करणाऱ्या 'बंधन'ने आज त्यांना भारतीय रिझर्व्ह बँकेकडून परवाना मिळाल्याचे जाहीर केले असून नव्या बँकेचे ऑगस्टमध्ये शुभारंभ करण्याचे घोषित केले आहे.

किरकोळ आणि छोटे व्यावसायिक यांना लक्ष्य केले जाणार असून प्रारंभी ५०० ते ६०० शाखा सुरू केल्या जातील, असे बंधन फायनान्शियल सर्व्हिसेसचे संचालक चंद्रशेखर घोष यांनी आज येथे पत्रकारांना सांगितले.

'बंधन'सह पायाभूत क्षेत्रांना वित्तपुरवठा करणाऱ्या 'आयडीएफसी'ला गतवर्षी रिझर्व्ह बँकेने बँक परवान्यासाठी तात्पुरता हिरवा कंदिल दाखविला आहे.